# खिडकीच्या पल्याड Lyrics In Marathi

काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?
नक्की काय बरं असतं त्या खिडकीच्या पल्याड ?
एका चौकटीत सामावलेल आकाश
की आत मधे बंदिस्त झालेले आपण
तळहातावर मावेल इतका सुर्य
की आभाळभर पसरलेला चंद्र
खरचं नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

बेभान होणारी माणसं
की जमिनीचं भान ठेऊन
उंच जाणारे विहंग
आकाशाने उधळलेले रंग
की आपल्या डोळ्यांना समजणारे चित्र
खरचं नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

बंधन झुगारून कोसळणारा पाऊस
Bharatlyrics.com
की डोळ्यात बांधलेला अश्रूंचा पूर
आपल्याला समजलेलं जग
की आपल्या अज्ञानातलं विश्व
खरचं नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

पण असं एकांतात बसून
पडलेले प्रश्न सुटतील कसे ?
खिडकीचा पलीकडे बघायचं
तर एकदा तरी ह्या चौकटीतून बाहेर पडावं लागेल
डोळे उघडून हे अथांग आकाश बघावं लागेल
मग कळेल का आपल्याला
खरचं नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

कधी लाटांमधून खळखळणार हास्य दिसेल
तर हात पसरवून आपल्याला बोलवणार
आपल्याच स्वप्नांचं क्षितिज उभं असेल
उंचच उंच भरारी घ्यायला निळ आभाळ असेल
आणि अंगभर शहारणारा वारा रुचेल
आता तरी कळेल ना आपल्याला
खरचं नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

आणि हे सगळं अनुभवायला
डोळ्यांची कवाडं कधीतरी उघडायला हवित
मनातले गुंते सुटायला आणि
वरती पडलेल्या प्रशांची उत्तरं शोधायला
एकदातरी आपल्या ह्या हृदयाची खिडकी
उघडायला हवीच

तेव्हाच कळेल आपल्याला की
नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?
खरचं कळेल आपल्याला की
नक्की काय असतं त्या खिडकीच्या पल्याड ?

*More Lyrics from [Video Palace]*

# Khidkichya Palyad Song Lyrics

Kay asat tya khidkichya palyad?
Nakki kay bar asat tya khidkichya palyad?
Eka chautit samavlel akash
Ki aat madhe bandist itka surya
Ki abhalbhar pasarlela chandra
Kharach nakki kay asat tya khidkichya palyad?

Bebhan honari manas
Ki jaminich bhan theun
Unch janare vihang
Akashane udhallele rang
Ki aaplya dolyana samajnare chitra
Kharach nakki kay asat tya khidkichya palyad?

Bandhan jhugarun kosalnara paus
Ki dolyat bandhlela ashrucha poor
Bharatlyrics.com
Aapalyala samajlel jag
Ki aaplya agyanatal vishwa
Kharach nakki kay asat tya khidkichya palyad?

Pan as ekantat basun
Padlele prashna sutatil kase?
Khidkicha palikade baghaych
Tar ekda tari hya chauktitun baher padaw lagel
Dole ughdun he athag akash baghav lagel
Mag kalel ka aapalyala
Kharach nakki kay asat tya khidkichya palyad?

Kadhi laatamdhun khalkhalnaar hasya disel
Tar haat pasarvun aapalyala bolavnaar

Aaplyach swapnach kshitaj ubha asel
Unchach unch bharari ghyayla neel abhal asel
Aani angbhar shaharnaara vaara ruchel
Aata tari kalel na aapalyala
Kharach nakki kay asat tya khidkichya palyad?

Aani he sagal anubhavayala
Dolyanchi kawad kadhitari ughadayla havit
Manatale gunte sutayala aani
Varti padlelya prashanchi uttar shodhayla
Ekdatari aaplya hya hridyachi khidaki
Ughadayla havich
Tevhach kalel aapalyala ki
Nakki kay bar asat tya khidkichya palyad?
Kharach kalel aapalyala ki
Nakki kay bar asat tya khidkichya palyad?

---

*More Lyrics from Video Palace*

BHARAT lyrics